कार्यक्रम बाब क्र. : १

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३०व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३०व्या सभेचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सोबत जोडण्यांत येत आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३० व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३० वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. दिलीप सोपल यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २० मे, २०१४ रोजी सायंकाळी २.३० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना.श्री. दिलीप सोपल, मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा. ना. श्री. जयंत पाटील, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष.
३) मा.ना.श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४) मा.श्री.राजेशकुमार मिना, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५) मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.विनोद गडेकर, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मुंबई.
६) श्रीमती सोनिया सेठी, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ.श्री.हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे.
२) श्री.माधव जवादे, मुख्य अभियंता (प्रभारी) म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
३) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
४) श्री.बी.एस.पाटील, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्रभारी), म.जी.प्रा., मुंबई.
५) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (प्रभारी),(मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** मा.संचालक मंडळाच्या नवीन सदस्यांचे स्वागत व मावळत्या सदस्यांचे आभार.

श्री.राजेशकुमार, भाप्रसे यांनी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव म्हणुन व श्रीमती सोनिया सेठी, भाप्रसे यांनी, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण म्हणुन दि.१२.९.२०१३ रोजी कार्यभार स्वीकारला असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाचे सदस्य म्हणुन प्रथमच बैठकीस उपस्थित रहात असल्याने, त्यांचे

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा.संचालक मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्याचप्रमाणे तत्कालिन प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व तत्कालिन सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे आभार मानण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२९ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाची १२९ वी सभा दि.१६ जुलै, २०१३ रोजी संपन्न झाली असुन, त्याच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत असून, त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास केली.

सदर इतिवृत्तावर चर्चा करीत असताना, कार्यक्रम बाब क्र. १२ अन्वये सादर केलेल्या, मजीप्रामार्फत चालविण्यात येत असलेल्या पा.पु. केंद्रावर अल्ट्रासॉनिक पध्दतीची घरगुती जलमापके उभारण्याबाबतच्या कार्यक्रम बाबीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये मा. मंत्री, ग्रामविकास यांनी सदरची जलमापके आष्टा व इस्लामपुर नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेवर उपलब्ध करुन दिल्यास, त्यासाठीचा निधी त्यांच्याकडुन उपलब्ध करुन देण्यात येईल, असे नमुद केले. तथापि, सदरची जलमापके मजीप्राच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रासाठी उपलब्ध करण्यात येत असल्याबाबत अवगत करण्यात आले.

प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी नमूद केले की, एखाद्या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत सर्व ग्राहकांना जलमापके बसविण्याबाबत कार्यवाही करावी. यावर सदरची जलमापके ही मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रामध्ये अस्तित्वातील ज्या ग्राहकांची जलमापके नादुरुस्त आहेत त्या ग्राहकांचा आढावा घेऊन, एकत्रित जलमापके खरेदी करुन ती मजीप्रामार्फत बसविण्याचे व त्याची किंमत त्या-त्या ग्राहकांकडुन वसुल करण्याचा निर्णय मा.संचालक मंडळाच्या १२५ व्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे अवगत करण्यात आले.

सदर चर्चेत, खरेदी करण्यात आलेल्या २०००० जलमापकांच्या उपलब्धतेबाबत मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी विचारणा केली असता, पुढीलप्रमाणे अवगत करण्यात आले.

- प्रथमतः मुख्य अभियंता यांच्या दि.९.५.२०१३ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार सदर २०००० जलमापके लातुर पाणी पुरवठा केंद्रासाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दि.१६.५.२०१३ च्या पत्रान्वये घेण्यात येऊन उपलब्ध करुन देण्यात आली.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

- तथापि, केवळ ५८० जलमापकांची उभारणी करण्यात आली. मात्र, जलमापके बसविण्यास नागरिकांचा विरोध झाल्याने, उर्वरित जलमापकांपैकी १५०० जलमापके अंजनगांव पाणी पुरवठा केंद्रावर उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव मु.अ. यांनी दि.२४.१.१४ च्या पत्रान्वये सादर केला होता. सदर प्रस्तावास दि.२०.२.२०१४ च्या पत्राद्धारे मान्यता प्रदान करण्यात येऊन, उर्वरित जलमापके आवश्यकतेनुसार इतर पाणी पुरवठा केंद्रांवर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले.
- उर्वरित १७९२० जलमापके इतर पाणी पुरवठा केंद्रांवर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे, असे मुख्य अभियंता (ज.व्य.) यांनी नमूद केले.

| अ. क्र. | पा.पु. केंद्राचे नांव | व्यासनिहाय जलमापके (मि.मी) | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १५ | २० | २५ | ४० | |
| १ | अंबरनाथ | ४००० | १७४ | ३४ | २ | ४२१० |
| २ | सातारा | १७०० | ११७ | १२७ | १० | १९५४ |
| ३ | अंजनगांव | १५०० | ० | ० | ० | १५०० |
| ४ | ७९ गांवे | २५०० | ० | ० | ० | २५०० |
| ५ | अमरावती | ३००० | ० | ० | ० | ३००० |
| ६ | यवतमाळ | २६०० | १४७ | ० | ० | २७४७ |
| ७ | वेण्णा | १००० | ० | ० | ९ | १००९ |
| ८ | बल्लारपूर | १००० | ० | ० | ० | १००० |
| | एकूण | १७३०० | ४३८ | १६१ | २१ | १७९२० |

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२९ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेली कृतीच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.१६ जुलै, २०१३ रोजी संपन्न झालेल्या १२९ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मान्यता देणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यामध्ये अधिकचा तपशीलाबाबत संचालक (वित्त), यांनी मा.संचालक मंडळास अवगत

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

केले. चर्चेअंती सन २०१३-१४ च्या सुधारित व सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत संचालक (वित्त) यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्यरित्या गुंतवावी, याबाबत शासनाकडुन वेळोवळी मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या जातात. त्यानुसार मजीप्राकडुनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, मा.राज्यमंत्री महोदयांनी, दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीबाबत जसे त्यांना कळविण्यात येते, तसेच अल्प मुदतीच्या गुंतवणुकीबाबत अवगत करण्याबाबत सुचित केले. यावर तशी कार्यवाही यापुढे करण्यात येईल, असे नमुद करण्यात आले. चर्चेअंती पुढीलप्रमाणे कार्यक्रम बाबीद्वारे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन, पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, दि.१३.०७.२०१३ ते दि.०२.०५.२०१४ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :** राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नागपुर पेरीअर्बन १० गावे तसेच नागपुर सुधार प्रन्यास यांच्या मागणीनुसार समाविष्ट गावांसाठीची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (ता. वि जि. नागपुर) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना म्हणुन चालविणे तसेच योजनेत समाविष्ट पेरी अर्बन भागातील थेट ग्राहकापर्यंत व नागपुर सुधार प्रन्यास क्षेत्रासाठी ठोक तत्वावर पाणी पुरवठा करण्यासाठी मंजुरी मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले व त्याबाबतचा अधिकचा तपशील मुख्य अभियंता, ना. व ग्रा. यांनी सादर केला.

नागपुर पेरी अर्बन व १० गावे तसेच नागपुर सुधार प्रन्यास यांच्या मागणीनुसार

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

समाविष्ट गावांसाठीच्या पाणी पुरवठा योजनेच्या रु. २३२.७४ कोटी किंमतीच्या प्रस्तावास शासनाने दि. ३१.१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अट क्र. २ नुसार, सदर योजना मजीप्राने पाणीपट्टी वसुलीसह मजीप्राची योजना म्हणुन थेट ग्राहकापर्यंत व नागपुर सुधार प्रन्यास क्षेत्राला ठोक पाणी पुरवठा करावयाचा आहे. त्यासाठी सदर बाब मा.संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर करुन घेण्याचे अनिवार्य केले आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा. संचालक मंडळास सदस्य सचिव यांना अवगत केले.

सदर योजनेसाठीची लोकवर्गणीची रक्कम केवळ रु. ८९.८४ लक्ष इतकी असून, नागपुर सुधार प्रन्यास यांचा भांडवली हिस्सा रु.१०४.९२ कोटी इतका असल्याचे मुख्य अभियंता यांनी स्पष्ट करुन सदरची योजना मजीप्राच्या हिताची असल्याचे संचालक मंडळास अवगत केले. त्यास मा.राज्यमंत्री महोदयांनी दुजोरा दिला. सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन, पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठरावः**

असा ठराव करण्यात येतो की,

१. नागपुर पेरी अर्बन व १० गावे पाणी पुरवठा योजनेस दि.३१.१.२०१४ च्या शासन निर्णय क्र.ग्रापापु-२०१२/प्र.क्र.७३/पापु.१३, अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून, सदरची योजना मजीप्रामार्फत राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
२. सदर योजना मजीप्राने पाणीपट्टी वसुली करुन मजीप्राची योजना म्हणुन चालविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
३. मजीप्राने योजनेत समाविष्ट पेरीअर्बन भागातील थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यास त्याचप्रमाणे नागपुर सुधार प्रन्यास क्षेत्रासाठी ठोक तत्वावर पाणी पुरवठा करण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
४. सदरची योजना चालविण्यासाठी मजीप्राने आवश्यक ती पाणीपट्टी वसुल करुन दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचा खर्च भागविणे व देखभाल दुरुस्ती करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.७ : गोंदिया पाणी पुरवठा केंद्र

अस्तित्वातील शुध्द पाण्याच्या ४५० मि.मी.व्यासाच्या लोखंडी उर्ध्वनलिकेचे रेल्वेच्या हद्दीतुन व रेल्वे पुलाखालुन टाकलेल्या पाईप लाईनचे Security Deposit व Way leave Charges भरण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले व त्याबाबतचा अधिकचा तपशील मुख्य अभियंता, ना. व ग्रा. यांनी सादर केला.

गोंदिया पाणी पुरवठा केंद्र मजीप्राच्या मालकीचे असून, या शहराच्या UIDSSMT कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजनेतील ६०० मि.मी.व्यासाची फिडरमेन ही रेल्वे पुलाखालुन व रेल्वेच्या हद्दीतुन टाकावयाची आहे. सदर नवीन पाईप लाईनची रेल्वेकडुन परवानगी घेत असताना, जुन्या सन १९७५-७६ दरम्यान टाकण्यात आलेल्या मात्र अस्तित्वात असलेल्या ४५० मि.मी. व्यासाची पाईप लाईन टाकताना आवश्यक परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले. त्यानुसार या उर्ध्वनलिकेचे सन १९७५-७६ ते सन २०१२-१३ तसेच सन २०१३-१४ ते पुढील सन २०२२-१३ या कालावधीसाठीचे Security Deposit व Way leave शुल्क रु. ४९.५४ लक्ष भरण्याची मागणी रेल्वे खात्याने मजीप्राकडे केली आहे.

त्याचप्रमाणे प्रगतीपथावरील योजनेसाठीची पाईप लाईन रेल्वे हद्दीतुन व रेल्वे पुलाखालुन टाकण्यासाठीच्या Security Deposit व Way leave शुल्काची तरतुद मंजुर योजनेत असल्याने, त्या तरतुदीच्या रकमेतुन रु. ४०.७१ लक्ष रकमेचा भरणा रेल्वे खात्यास करण्यात आला आहे. मात्र, रेल्वे खात्याने जुन्या पाईप लाईनच्या Security Deposit व Way leave शुल्कापोटी मागणी केलेल्या रकमेची तरतूद नसल्याने व सदर रक्कम उपलब्ध करावी लागत असल्याने, तसेच UIDSSMT अंतर्गत नवीन वाढीव योजनेची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, वसुली पुढील ३० वर्षाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्यात आली असल्याने व मूळ योजना म.जी.प्रा.च्या मालकीची असल्यामुळे, मजीप्राची योजना म्हणुन रु. ४९.५४ लक्ष इतकी रक्कम मजीप्रास स्वनिधीतुन उपलब्ध करावी लागणार आहे. त्यासाठी मा.संचालक मंडळाची मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले. सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

मुळ योजनेअंतर्गत रेल्वे क्रॉसिंगकरीता टाकलेल्या ४५० मि.मी. व्यासाच्या लोखंडी पाईप लाईनकरीता रेल्वे विभागाने मागणी केल्याप्रमाणे पुढीलप्रमाणे एकुण रक्कम रु.४९,५४,२४६/- म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून रेल्वे विभागास भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| वर्ष | Way leave charges | अनामत रक्कम | एकूण |
|---|---|---|---|
| १९७५-७६ ते २०१२-१३ | रु. ७८७५०५/- | रु. ११५४००/- | रु. ९०२९०५/- |
| २०१३-१४ ते २०२२-२३ | रु. ३६६७२५६/- | रु. ३८४०८५/- | रु. ४०५१३४१/- |
| | | | रु. ४९५४२४६/- |

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :** <u>तिरोडा पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती</u> पाणीपट्टी देयके महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,तिरोडा यांच्यामार्फत स्वीकारणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले व त्याबाबतचा अधिकचा तपशील संचालक (वित्त) यांनी सादर केला.

सदरचे पाणी पुरवठा केंद्र मजीप्राच्या मालकीचे असून, या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत पाणीपट्टी संकलनाचे काम भारतीय स्टेट बँक शाखा, तिरोडा यांच्यामार्फत दि. १३.९.१९९३ पासुन प्रतिदेयक रु.१.५०/- इतके शुल्क आकारुन करण्यात येत असे. तथापि, सदर सेवा मजीप्रास देताना एक गठ्ठा येणारी देयके व त्यामुळे बँकेमध्ये होणारी गर्दी व त्याचा त्रास नियमित ग्राहकांना होत असल्याने, सदरची सेवा देणे अशक्य असल्याबाबत बँकेने मजीप्रास कळविले होते. तद्नंतर, पर्यायी व्यवस्था करावी अन्यथा बँकेच्या धोरणानुसार रु. ४५/- प्रतिदेयक आकारण्यात येईल, असे कळविले. याबाबत पाठपुरावा करण्यात आला असता, बँकेने जुलै, २०१३ पासुन प्रतिदेयक रु. २५/- आकारणी सुरु करुन तशी कपात केली. सदर रु.२५/- मजीप्राच्या दृष्टीने किफायतशीर नव्हता.

या कालावधीत तिरोडा शहरांतर्गत महिला नागरी पतसंस्था, तिरोडा यांच्यामार्फत बिल संकलनाचे काम प्रतिदेयक रु.१.५०/- या दराने करण्यास इच्छुक असल्याबाबतचा प्रस्ताव मजीप्राच्या स्थानिक कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्ताव मध्यवर्ती

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य/सचिव
म.जी.प्रा.

कार्यालयाच्या वित्त शाखेस प्राप्त झाला असता, संचालक (वित्त), यांनी त्यास मान्यता प्रदान करताना मा.संचालक मंडळाच्या आगामी बैठकीत प्रस्ताव सादर करुन मान्यता घेण्याच्या अटीस अधीन राहुन दि.१७.९.२०१३ रोजी अनुमती दिली होती. त्यानुसार सदर महिला नागरी पतसंस्थेसोबत दि.२१.९.२०१३ रोजी एक वर्षासाठी करारनामा करण्यात आला असून, सदर संस्थेने मजीप्राकडे सुरक्षा ठेव म्हणुन रु. ५००००/- इतकी रक्कम FDR स्वरुपात जमा केली आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. सदर चर्चेदरम्यान, अस्तित्वातील करारनामा संपुष्टात आल्यानंतर या पतसंस्थेने प्रतिदेयक आकारणीच्या अस्तित्वातील रु.१.५०/- प्रतिदेयक शुल्कामध्ये वाढीची मागणी केल्यास, योग्य तो निर्णय सदस्य सचिव यांनी घ्यावा, असे मा.अध्यक्ष महोदय तसेच मा. उपाध्यक्ष महोदयांनी सुचित केले. सदर मान्यतेनुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. तिरोडा पाणी पुरवठा केंद्रातुन केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या पाणी देयक (Water Bill) संकलनासाठी महिला नागरी सहकारी पत संस्था, मर्यादित, तिरोडा (र.नं.८०७) यांच्या केलेल्या नियुक्तीच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर करारनाम्याची मुदत दि.२१.९.२०१३ ते २०.९.२०१४ अखेर असुन, करारानाम्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर यापुढील कालावधीसाठी सदरचे काम करण्यास सदर पतसंस्था इच्छुक असल्यास, सध्या आकारण्यात येणारे रु. १.५० प्रतीदेयक शुल्क पत संस्थेस यापुढील कालावधीसाठी कायम रहातील.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ :** खामगांव पाणी पुरवठा योजना सध्याच्या ठोक स्वरुपाऐवजी थेट ग्राहकांपर्यत पाणी पुरवठा करुन दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता म.जी.प्रा.कडे हस्तांतरित करणे.

**केलेल्या कार्यवाहीबाबत मा. संचालक मंडळास अवगत करणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

नगरपरिषदेच्या मागणीनुसार, मजीप्रामार्फत ठोक पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या खामगांव पाणी पुरवठा केंद्रांतर्गत थेट ग्राहकापर्यंत पाणी पुरवठा करण्याची मागणी नगरपरिषद, खामगांव यांनी दि.११.२.२०१३ च्या ठरावाद्वारे मजीप्राकडे केली होती. त्यानुसार अनुषंगिक प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे दि.१६.७.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या १२९ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

सदर बैठकीत, सदर प्रस्तावाचे तपशीलवार सादरीकरण मा.अध्यक्ष,मजीप्रा उपाध्यक्ष, मजीप्रा तसेच प्रधान सचिव यांना करण्याचे निर्देश प्राप्त होते. त्यानुसार सदर सादरीकरण नागपुर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान दि. १२.१२.२०१३ रोजी मजीप्राच्या नागपुर कार्यालयात करण्यात आले. सदर सादरीकरणादरम्यान घेतलेल्या निर्णयानुसार काही अटींच्या अधीन राहुन सदर योजना हस्तांतरित करुन घेण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात आला आहे.

तथापि, मुख्याधिकारी, नगरपरिषद खामगांव यांनी काल दि.१९.५.२०१४ च्या पत्र क्र. खानपा/पापुवि/३१/२०१४ च्या पत्राद्वारे नगरपालिका स्वत: संपुर्ण पाणी पुरवठा योजना राबवु इच्छिते, असे नमूद करुन यापुर्वी देण्यात आलेला ठराव आगामी सभेसमोर चर्चेला घेऊन रद्द करण्याची कार्यवाही प्रस्तावित करुन, तसे आपल्या विभागाला अवगत करण्यात येईल, असे कळविले आहे.

यावर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. सदरची योजना नगरपरिषदेच्या पुर्वीच्या ठरावानुसार सध्याच्या ठोक स्वरुपाऐवजी थेट ग्राहकापर्यंत पाणी पुरवठा करुन दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता मजीप्राकडे हस्तांतरित करुन घेण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

२. नगरपरिषदेकडे असलेली सर्व थकबाकी प्राप्त करुन घेण्यात यावी.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० :** अंबाजोगाई पाणी पुरवठा योजना
उद्‌भवापासुन ते थेट ग्राहकापर्यंत दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता म.जी.प्रा.कडे हस्तांतरित करणे.
**केलेल्या कार्यवाहीबाबत मा. संचालक मंडळास अवगत करणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मागणीनुसार, अंबाजोगाई शहरासाठीची अस्तित्वातील व प्रगतीपथावरील योजना उद्‌भवापासुन थेट ग्राहकापर्यंत देखभाल-दुरुस्तीसह व पाणीपट्टी वसुलीसह मजीप्राने राबविण्यासाठी दि.३०.१.२०१३ च्या ठरावाद्वारे मजीप्राकडे केली होती. त्यानुसार अनुषंगिक प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे दि.१६.७.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या १२९ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

सदर बैठकीत, सदर प्रस्तावाचे तपशीलवार सादरीकरण मा.अध्यक्ष,मजीप्रा उपाध्यक्ष, मजीप्रा तसेच प्रधान सचिव यांना करण्याचे निर्देश प्राप्त होते. त्यानुसार सदर सादरीकरण नागपुर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान दि. १२.१२.२०१३ रोजी मजीप्राच्या नागपुर कार्यालयात करण्यात आले होते. सदर सादरीकरणानुसार सदरची योजना मजीप्राने दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी हाती घेणे मजीप्राच्या हिताचे नसल्याचे दिसुन आले. यावर सर्व संमत्तीने सदर योजना हाती घेण्याबाबतचा प्रस्ताव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

सदरची योजना मजीप्राने दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी हाती घेणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसल्याने, मजीप्राने चालविण्यास घेऊ नये. यानुसार नगरपरिषदेस कळविण्यात यावे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.११ :** लातुर शहर पाणी पुरवठा व्यवस्थापन करारनामा (PPP) धर्तीवर होती ती आता पुनःश्च नियमित दैनंदिन देखभाल व दुरुस्ती म्हणुन मजीप्राने चालविणेस घेतली असल्याबाबत.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले व त्याबाबतचा अधिकचा तपशील मु.अ. जलव्यवस्थापन यांनी सादर केला.

लातुर शहर पाणी पुरवठा व्यवस्थापन करारनामा (PPP) धर्तीवर होती त्या अंतर्गत एकूण तीन (पक्ष) यंत्रणांचा अनुक्रमे लातुर म.न.पा., म.जी.प्रा. व लातुर पाणी पुरवठा व्यवस्थापन कंपनी लातुर यांचा सहभाग होता, त्यापैकी लातुर पाणी पुरवठा योजना व्यवस्थापन कंपनी (LWSMC) ने, सदर योजना चालविणेच्या आर्थिक दायित्वाची जबाबदारी स्वीकारणे शक्य नसल्याचे दि. ९.३.२०११ च्या पत्राव्दारे कळविले. त्यानंतरचा घटनाक्रम पुढीलप्रमाणे आहे.

- कंपनीच्या दि.९.३.२०११ च्या पत्रास निविदेतील विविध कलमे स्पष्ट करुन, दि.१६.३.२०११ रोजी मजीप्रामार्फत सविस्तर नोटीस देण्यात आली.
- दि.२८.३.२०११ रोजी मा.मंत्री, ग्रामविकास केंद्र सरकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, सदर कंपनीने C.P.P. कालावधी वाढवून देण्याचे विनंती केली. त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश प्राप्त झाले.
- मा.प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३.५.२०११ रोजी बैठक संपन्न झाली.सदर बैठकीत, योजना नगरपरिषदेस हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार दि.२३.५.२०११ रोजी योजना न.प.स हस्तांतरित करण्यात आली.
- दि.२८.५.२०११ रोजी मा.मंत्री, ग्रामविकास केंद्र सरकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत असे ठरले की, LWSMC ही देखभाल दुरुस्ती यंत्रणा म्हणुन काम करेल व मजीप्रा प्र.व्य.स.से.म्हणुन काम करेल. त्याचप्रमाणे न.प.कडुन जलमापके बसविणे,पाणीपट्टी देयके अदा करुन वसुली करणे, विद्युत कंपनी व जलसंपदा तसेच रसायनांचा खर्च करेल. सदर बाबींच्या अनुषंगाने त्रिपक्षीय करारनामा करण्याचे निर्देश देण्यात आले.
- त्यानुसार, दि.२६.९.२०११ रोजी सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली लातूर नपा चे पदाधिकारी, अधिकारी व मजीप्राचे अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत, नपा चे ५५ कर्मचारी मजीप्राच्या अधिकार क्षेत्रात काम करतील, त्याचे वेतन दायित्व न.प.चे राहील. नळ जोडण्या मंजुर करणे, अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करणे, विद्युत कंपनी व जलसंपदा तसेच रसायनांचा खर्च मजीप्राने करणे. मात्र, पाणीपट्टी देयके अदा करुन वसुली केल्यानंतर मजीप्रास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी न.प.ची राहील, असा निर्णय झाला.

उपरोक्त निर्णयानुसार दि.१.१०.२०११ पासुन नियमित योजना म्हणुन मजीप्रामार्फत चालविण्यात येत आहे. तद्नंतर, मजीप्राकडुन पाणीपट्टी वसुलीही दि. १.४.२०१२ पासुन सुरु करण्यात आली. सदर बाब मा.संचालक मंडळास अवगत करण्यासाठीचा सदरचा प्रस्ताव असल्याचे नमूद करण्यात आले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावावर सर्वंकष व सखोल चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत संचालक मंडळाचे असे मत झाले की, सदरची योजना मजीप्राच्या हिताची नसल्याने, लातुर मनपा, मजीप्रा व लातुर पाणी पुरवठा व्यवस्थापन कंपनी दरम्यान झालेला करारनामा कायदेशीररित्या संपुष्टात आणुन मजीप्राने यातुन बाहेर पडणे योग्य राहील. सदर योजना मनपास हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

१. लातूर मनपा, मजीप्रा व लातूर पाणी पुरवठा व्यवस्थापन कंपनी दरम्यान यापूर्वी झालेला दि.४.६.२००८ चा करारनामा संपुष्टात आणण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कार्यवाहीसाठी कायदेशीर सल्ला घेणे, प्रतिदाव्यापोटीचा मजीप्राचा झालेला खर्च निश्चित करणे, त्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ वकीलाची नेमणुक करणे, इत्यादीबाबत निर्णय घेण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. लातूर शहर पाणी पुरवठा योजना, लातुर मनपास रितसर नोटीस देऊन सहा महिन्यांच्या कालावधीत हस्तांतरित करण्यात यावी.

३. सदर योजना मजीप्राकडे हस्तांतरित झाल्यापासुन योजनेवर आजपर्यंत केलेल्या रु.३४१७.४५ लक्ष इतक्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. मजीप्राने योजना हस्तांतरित करुन घेतल्यापासुन केलेल्या रु.३४१७.४५ लक्ष इतक्या झालेल्या खर्चातुन मजीप्रामार्फत ग्राहकांकडुन केलेली रु.१५५०.४८ लक्ष इतकी वसुली वजा जाता रु.१८६६.९७ लक्ष इतकी रक्कम लातुर मनपाकडुन वसुलपात्र असुन, सदरची रक्कम लातुर मनपाकडुन वसुल करण्यात यावी.

५. सद्य:स्थितीत लातुर मनपाकडुन मजीप्रास कर्जापोटी रु.१२९९१.४२ लक्ष, (एल.आय.सी.,हुडको खु.बा.कर्ज,गॅरंटी फी) व पाणीपट्टीपोटी रु. ७७१८.२५ लक्ष अशी एकुण रु.२०,७०९.७७ लक्ष इतकी रक्कम प्राप्त व्हावयाची आहे. सदरची संपुर्ण रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

याबाबत उचित कार्यवाही करण्यास सदस्य सचिव मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :** <u>अकोट ८४ खेडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जि. अकोला</u> दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरीता आर्थिक तरतुद मंजूर करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले व त्याबाबतचा अधिकचा तपशील मु.अ. ना. व ग्रा.व ज.व्य. यांनीही अवगत केला.

| | |
|---|---|
| मा. मंत्री,<br>पा.पु. व स्व. तथा<br>अध्यक्ष, म.जी.प्रा. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

सदरच्या योजनेचे कार्यान्वयन पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषद व मजीप्रादरम्यान संयुक्तपणे योजनेची पहाणी झाली व योजना हस्तांतरित करुन घेण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. तथापि, जिल्हा परिषदेने सदर योजना हस्तांतरित करुन घेतली नाही. मात्र, योजनेंतर्गत गावे खारपाण पट्टयातील असल्याने, नाईलाजास्तव मजीप्रामार्फत चालविण्यात येत आहे.

तथापि, सदर योजना चालविण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठीचे लेखाशिर्ष उपलब्ध करणे व झालेल्या रु. ३.१९ कोटी खर्चास मान्यता प्रदान करण्याचा व सदर योजना हस्तांतरित होईपर्यंत होणाऱ्या खर्चास मा. संचालक मंडळाची मान्यता प्राप्त करुन घेण्याचा सदरचा प्रस्ताव असल्याचे संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर सखोल व विस्तृत चर्चा करण्यात येऊन, सदरची योजना मजीप्राने चालविणे हिताचे नसुन, ती जिल्हा परिषदेस ६ महिन्यांची नोटीस देऊन नोव्हेंबर, २०१४ अखेर हस्तांतरित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. अकोट व ८४ गावे पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यापासुन आजपर्यंत मजीप्रामार्फत दैनंदिन देखभाल दुरुस्तीपोटी झालेल्या रु. ३.१९ कोटी खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेस रितसर नोटीस देण्यात येऊन सदर योजना ६ महिन्यांच्या कालावधीत जिल्हापरिषदेस हस्तांतरित करण्यात यावी. मात्र, हस्तांतरित होईपर्यंत होणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. या योजनेच्या परिचलनावर आतापर्यंत मजीप्रामार्फत करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम मजीप्राकडुन देखभाल दुरुस्तीपोटी वसुल झालेल्या रु.०.८० कोटी खर्चाच्या रकमेतुन वजा जाता, उर्वरित व योजना हस्तांतरित होईपर्यंत होणारा खर्च जिल्हा परिषदेकडुन मजीप्राने उपलब्ध करुन घ्यावा.

४. त्याचप्रमाणे असाच निर्णय इतर म्हणजेच, अहस्तांतरित असलेल्या व मजीप्रामार्फत देखभाल-दुरुस्ती करण्यात येत असलेल्या तोट्यातील योजनांच्या बाबतीतही घेण्यात

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

येऊन संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांना रितसर नोटीस देऊन सदर योजना ६ महिन्यांच्या कालावधीत संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करण्यात याव्यात.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१३ :** नगरपालिकेच्या विकास कामांना, UIDSSMT, JNNURM, सुजल निर्मल अभियान,महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान,नागरी/ग्रामीण दलित वस्ती इ. कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांना मजीप्रामार्फत तांत्रिक मान्यता प्रदान करणे **थकबाकी प्राप्त झाल्यानंतरच तांत्रिक मान्यता प्रदान करण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांना त्याचप्रमाणे केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत योजनांना सशुल्क तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येते. त्याचप्रमाणे तांत्रिक मुल्यांकनही करण्यात येते. तथापि, बऱ्याच स्थानिक स्वराज्य संस्थांकडुन त्यापोटीच्या शुल्काची बरीच रक्कम प्रलंबित आहे. सदरची रक्कम अंदाजे रु. ३.९६ कोटी इतकी आहे. त्यासाठी पाठपुरावा करुनही सदर रक्कम मजीप्रास प्राप्त करुन दिली जात नाही.

त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाणीपट्टी, लोकवर्गणी कर्ज इ. पोटीही सुमारे रु.३६२८ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे. त्याचबरोबर अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यापोटीही सुमारे ७.६० कोटी प्रलंबित आहे. त्यामुळे यापुढे प्राप्त होणाऱ्या अशा प्रस्तावांना तांत्रिक मान्यता/तांत्रिक मुल्यांकन करण्यापुर्वी प्रलंबित रक्कम प्राप्त करुन घ्यावी, असे प्रस्तावित असून मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबीवर सखोल व विस्तृत चर्चा होऊन, पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध विकास कामांना त्याचप्रमाणे केंद्र तसेच राज्यशासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत योजनांना सशुल्क तांत्रिक मान्यता/मुल्यांकन करण्यात येते, त्यापोटी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शुल्कापोटी रु.३.९६ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे. सबब, सदर शुल्क व नव्याने प्राप्त प्रस्तावापोटीचे अनुज्ञेय शुल्क प्राप्त करुन घ्यावे व तद्नंतर नवीन प्रस्तावांना तांत्रिक मान्यता/सहमती प्रदान करण्यात यावी. त्याचप्रमाणे योजनांचे तांत्रिक मुल्यांकन करण्यात यावे.

२. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांची अंदाजपत्रके व आराखडे मजीप्रामार्फत करण्यात आली आहेत. त्यापोटीचे रु. ७.६० कोटी शुल्क प्रलंबित आहे. अशा संस्थांच्या प्रस्तावांना सदर थकबाकीची रक्कम प्राप्त करुन घ्यावी व तद्नंतर येणाऱ्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता/सहमती प्रदान करण्यात यावी. त्याचप्रमाणे योजनांचे तांत्रिक मुल्यांकन करण्यात यावे.

३. नागरी संस्थांकडे पाणीपट्टी, देखभाल-दुरुस्ती, लोकवर्गणी,पूर्ण ठेव योजना, अंदाजपत्रके व आराखडे बनविणे इ. पोटी रु. १३८९.१० कोटी तसेच विविध कर्जापोटी रु. १३५०.५३ कोटी अशी एकुण रु. २७३९.६३ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे.

त्याचप्रमाणे ग्रामीण योजनांतर्गत जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींकडे पाणीपट्टी, देखभाल-दुरुस्ती, लोकवर्गणी इ.पोटी रु. ८८८.२४ कोटी रक्कम प्रलंबित आहे. सबब, या संस्थांकडुन थकबाकीची रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी, प्रधान सचिव, नगर विकास विभाग तसेच प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांच्याकडे पाठपुरावा करण्यासाठी सदस्य सचिव यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या ८२ व्या बैठकीपर्यंत घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर मा.संचालक मंडळाच्या दि. १६ जुलै, २०१३ पर्यंतच्या विविध बैठकांमध्ये शिक्कामोर्तब करुन घेण्यात आले आहे. दि. १६ जुलै, २०१३ नंतर म्हणजेच १२९ व्या बैठकीनंतर एकूण ३ निविदा समितीच्या बैठका पार पडल्या असुन, निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

सदर तिन्ही बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करुन घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यावर शिक्कामोर्तब करण्याची विनंती करण्यात आली.

त्यावर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब केले.

**कार्यक्रम बाब क्र.१५ :** नगरपालिकेच्या विकास कामांना तांत्रिक मंजुरी प्रदान करण्याबाबत.
**प्रचलित शुल्कात वाढ करणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मजीप्रामार्फत नगरपालिकेच्या विकास कामांना तांत्रिक छाननीपोटी आकारण्यात येत असलेल्या अंदाजित किंमतीच्या ०.८५% इतक्या शुल्कात ०.१५% इतकी वाढ करुन १% शुल्क आकारण्याचे प्रस्तावित असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले. प्रचलित ०.८५% शुल्क हे दि. २८ जुन, २०११ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या १२१ व्या बैठकीत मंजुर झाल्यानुसार लागु करण्यात आले होते. त्यापुर्वी सदरचे शुल्क ०.५०% इतके होते.

अशीच सेवा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ज्या संस्थांना देण्यात येते, त्या संस्थांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लागु करण्यात येणारे शुल्क हे १.२५% इतके असुन, ते अजुनही मजीप्राच्या प्रस्तावित शुल्कापेक्षा १% अधिक आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, मान्यतेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठरावः**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून नगरपालिकांच्या विकास कामांना तांत्रिक छाननीपोटी सध्या आकारण्यात येत असलेल्या अंदाजित किंमतीच्या ०.८५% इतक्या शुल्कात ०.१५% इतकी वाढ करुन १% इतके शुल्क आकारण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१६ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळावर अभिवक्त्यांच्या नियुक्ती करण्यासाठीच्या विनियमामध्ये सुधारणा करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सध्याची संरचना अंमलात येण्यापुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळावर वकीलांची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणाचे स्वतंत्र विनियम तयार करण्यात येऊन, शासनाच्या मंजुरीनंतर ते शासनाच्या राजपत्रात २२ जुलै, २००४ रोजी प्रसिध्द करण्यात येऊन लागु करण्यात आले.

तथापि, दि. ३.११.२०११ च्या मजीप्राच्या आदेशानुसार प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता कार्यालय न ठेवता, मुख्यालय स्तरावर त्यांच्याकडे विविक्षीत जबाबदारी देण्याचे ठरविण्यात आले. या नवीन संरचनेमुळे प्रादेशिक मुख्य अभियंता अस्तित्वात नसल्याने, अस्तित्वातील विनियमामध्ये जेथे-जेथे प्रादेशिक मुख्य अभियंता असा उल्लेख आहे त्या ठिकाणी मुख्य अभियंता, (नावग्रा) किंवा तत्सम मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे,त्यानुसार बदल करण्याचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन मान्यतेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, दि. ३ नोव्हेंबर, २०११ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आदेशातील नवीन संरचनेनुसार आता प्रादेशिक मुख्य अभियंता कार्यालय अस्तित्वात नसल्याने प्रचलित पॅनलवरील वकील निवडीसाठी जे विनियम शासन मान्यतेनंतर लागु करण्यात आले आहेत. त्या विनियमामध्ये प्रस्तावित सुधारणा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विनियम मधील अ.क्र. | मूळ विनिमयातील विनियम | विनियमात करावयाच्या बदलानंतर होणारा नविन विनियम |
|---|---|---|---|
| १ | ४ (१) | औरंगाबाद खंडपीठ व नागपूर खंडपीठ व मुंबई उच्च न्यायालय,मुंबई यांच्या समोर येणारी प्रकरणी हाताळणेसाठी अनुक्रमे मुख्य अभियंता, औरंगाबाद आणि मुख्य | औरंगाबाद खंडपीठ व नागपूर खंडपीठ व मुंबई उच्च न्यायालय,मुंबई यांच्या समोर येणारी प्रकरणी हाताळणेसाठी वकीलाचे पॅनल तयार करणेसाठी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचे |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| | | अभियंता,नागपूर यांच्या अधिकारितेत अधिवक्त्यांचे एक स्वतंत्र मंडळ गठीत करण्यात येईल.मुंबई येथील उच्च न्यायालयासमोर येणारी प्रकरणे हाताळण्यासाठी सदस्य सचिवाच्या पातळी वरील अधिवक्त्यांचे एक मंडळ गठीत करण्यांत येईल. | अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती खालील प्रमाणे गठीत करण्यांत येईल.<br>१. मुख्य प्रशासकीय अधिकारी- अध्यक्ष<br>२. संबंधित परिमंडळातील ज्येष्ठ अधीक्षक अभियंता- सदस्य<br>३. कायदा व कामगार अधिकारी- समितीचे सदस्य सचिव |
| २ | ४(२) | या प्रत्येक मंडळामध्ये समावेश करावयाच्या अधिवक्त्याची संख्या ही तीनपेक्षा अधिक नसेल. | औरंगाबाद,नागपूर खंडपीठ व मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथील वकीलाच्या पॅनलवर समावेश करावयाच्या अधिवंक्त्याची संख्या प्रत्येकी तीन पेक्षा अधिक नसेल. |
| ३ | ४(४) | मंडळात अंतर्भाव करण्यासाठी अधिवक्त्यांची निवड करण्याकरिता प्रमुखपदी सदस्य सचिव आणि सदस्य म्हणून मु.प्र.अधि.व औरंगाबाद व नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंते आणि सदस्य सचिव म्हणून विधी व कामगार अधिकारी यांचा समावेश असलेली निवड समिती गठीत करण्यात येईल. | वरिल विनियम ४(१) मध्ये प्रस्तावीत सुधारित विनिमयाच्या अनुषंगाने विनियम क्र.४(४) पूर्णपणे वगळण्याचे प्रस्तावित आहे. |
| ४ | ५/(क) | मुख्य अभियंता, नागपूर, मुख्य अभियंता, औरंगाबाद आणि सदस्य सचिव, म.जी.प्रा.हे मुंबई औरंगाबाद व नागपूर येथील उच्च न्यायालयात म.जी.प्रा.चे प्रतिनिधीत्व करण्यासाठी जे सक्षम अधिवक्ते इच्छूक आहेत अशा अधिवक्त्यांचा अधिवक्ता मंडळात समावेश करण्यात यावा यासाठी, त्यांची नांवे व त्यांची वैयक्तिक माहिती,शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा तपशिल इ.मिळण्यासाठी अनुक्रमे औरंगाबाद नागपूर व मुंबई येथील संबधित वकील परिषदेशी संपर्क साधतील. | विनियम ४(१) अन्वये गठित समिती ही मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथील उच्च न्यायालयात मजीप्रा चे प्रतिनिधित्व करण्यासाठी जे सक्षम अधिवक्ते इच्छूक आहेत अशा अधिवक्त्यांचा अधिवक्ता मंडळात समावेश करण्यात यावा यासाठी, संबंधीत विभागामध्ये प्रसारित होणाऱ्या जास्तीत जास्त खपाच्या दैनिकात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. व असे इच्छुक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यावर निवड समितीद्वारे संबंधीत इच्छुक उमेदवारांची मुलाखत घेऊन सुयोग्य वकीलाची निवड निवड समितीद्वारे पॅनलवर करण्यात येईल. |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ५(८) | उच्च न्यायालयीन प्रकरणासाठी मंडळात समावेश करण्यात आलेला अधिवक्ता, प्रत्येक प्रकरण दाखल करुन घेतल्याबाबतची /त्याची सुनावणी/ कार्यवाही /निर्णय याबाबतची लेखी माहिती त्या त्या वेळी संबंधित क्षेत्रिय मुख्य अभियंत्यास / सदस्य सचिवास कळविण्यास कर्तव्यबध्द असेल. | विनियम ५ (८) मधील क्षेत्रीय हा शब्द वगळण्याचे प्रस्तावित आहे.त्यानंतर सुधारित विनियम ५(८) खालील प्रमाणे राहिल.<br>उच्च न्यायालयीन प्रकरणासाठी मंडळात समावेश करण्यात आलेला अधिवक्ता, प्रत्येक प्रकरण दाखल करुन घेतल्याबाबतची / त्याची सुनावण. / कार्यवाही /निर्णय याबाबतची लेखी माहिती त्या त्या वेळी संबंधित मुख्य अभियंत्यास /अधीक्षक अभियंता/सदस्य सचिवास कळविण्यास कर्तव्यबध्द असेल. |
| ६ | ५(१) | दिवाणी, फौजदारी, कामगार व औद्योगिक न्यायालयीन प्रकरणे मंडळ व विभागीय पातळीवर हाताळण्यासाठी त्या त्या क्षेत्रिय पातळीवर प्रत्येक जिल्हयासाठी वकील मंडळ तयार करण्यांत येईल आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित परिमंडळ मुख्य अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती पुढील प्रमाणे गठीत करण्यात येईल.<br>१.परिमंडळातील सर्व अधी.अभि.-सदस्य<br>२.संबंधित कार्य.अभि.बांध.वि.-सदस्य<br>३.परिमंडळ कार्यालयातील विशेष अधिक्षक किंवा कार्यालय अधिक्षक-सदस्य सचिव | विनियम ५(१) मधील संबधित परिमंडळ मुख्य अभियंताच्या ऐवजी परिमंडळीय अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक परिमंडळात निवड समिती गठीत करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानंतर सुधारित विनियम ५(१) खालीलप्रमाणे राहिल.<br>दिवाणी, फौजदारी, कामगार व औद्योगिक न्यायालयीन प्रकरणे मंडळ व विभागीय पातळीवर हाताळण्यासाठी त्या त्या क्षेत्रिय पातळीवर प्रत्येक जिल्हयासाठी वकील मंडळ तयार करण्यांत येईल आणि त्या प्रयोजनासाठी त्या त्या परिमंडळासाठी परिमंडळीय अधीक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती पुढील प्रमाणे गठीत करण्यात येईल.<br>१.संबंधित परिमंडळीय अधीक्षक अभियंता -अध्यक्ष<br>२.परिमंडळातील सर्व अधी.अभि.-सदस्य |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३.त्या परिमंडळातील एक सर्वात जेष्ठ कार्यकारी अभियंता - सदस्य<br>४.परिमंडळ कार्यालयातील विशेष अधिक्षक किंवा कार्यालय अधिक्षक- सदस्य सचिव |
| ७ | ५(४) | परिमंडळ मुख्य अभियंता हा संबंधित वकील परिषदाकडून आणि अन्य ठिकाणाहून अधिकार मिळण्यास इच्छूक असलेल्या वकीलांची नावे व त्यांची वैयक्तिक माहिती मागवील. प्राप्त झालेली सर्व आवेदनपत्रे अंतिम निवडीसाठी निवड समितीसमोर असतील. | विनियम क्र.५(४) परिमंडळ मुख्य अभियंता या शब्दा ऐवजी परिमंडळीय अधीक्षक अभियंता असा बदल करण्यांचे प्रस्तावित आहे.त्यानंतर सुधारित विनियम५(४) खालीलप्रमाणे राहिल. परिमंडळीय अधीक्षक अभियंता हा संबंधित वकील परिषदाकडून आणि अन्य ठिकाणाहून मजीप्रा पॅनेलवर काम करण्यास इच्छूक असलेल्या वकीलांची नावे व त्यांची वैयक्तिक माहिती त्या विभागामध्ये जास्त खपाच्या दैनिकात जाहिरात देऊन मागवील. प्राप्त झालेली सर्व आवेदनपत्रे अंतिम निवडीसाठी निवड समितीसमोर ठेवील. आणि प्राप्त झालेल्या इच्छुक उमेदवारांची मुलाखत निवड समिती द्धारे घेण्यात येऊन सुयोग्य वकीलाची नियुक्ती पॅनलवर करण्यात येईल. |
| ८ | ५(९) | निवड झालेल्या व मंडळावर घेतलेल्या वकीलास संबंधित मुख्य कार्यकारी अभियंत्याला किंवा, यथास्थिती, सदस्य सचिवला उद्देशून लिहिलेली एक महिन्याची आगाऊ नोटीस देऊन मंडळाचा राजीनामा देता येईल. | या विनियममध्ये संबंधीत मुख्य कार्यकारी अभियंता ऐवजी संबंधित मुख्य अभियंता असा बदल करण्याचे प्रस्तावित आहे. सुधारित विनियम ५(९)खालील प्रमाणे राहिल.<br>निवड झालेल्या व मंडळावर घेतलेल्या वकीलास संबंधित मुख्य अभियंता किंवा,यथास्थिती, सदस्य सचिवला उद्देशून लिहिलेली एक महिन्याची आगाऊ नोटीस देऊन मंडळाचा राजीनामा देता येईल. |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | ५(१२) | सदस्य सचिवास किंवा **परिमंडळ मुख्य अभियंत्यास,** विशिष्ट प्रकरणामध्ये जर त्याच्या मते प्राधिकरणाचे हित/ सार्वजनिक हित सुरक्षित ठेवण्यासाठी प्रस्तुत मंडळावर बाहेरच्या कोणत्याही वकिलाला नियुक्त करण्याची कार्यवाही करणे आवश्यक असल्यास,त्याबद्दलची लेखी कारणे नमूद केल्यानंतर करता येईल. अशा विशेष वकिलाला / समुपदेशीला म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या दरानुसार पारिश्रमिक देण्यांत येईल. | या विनियम मधील किंवा परिमंडळ मुख्य अभियंत्यास हे शब्द वगळण्याचे प्रस्तावित आहे. सुधारित विनियम ५(१२) खालील प्रमाणे राहिल. **सदस्य सचिवास विशिष्ट प्रकरणामध्ये जर त्याच्यामते प्राधिकरणाचे हित/ सार्वजनिक हित सुरक्षित ठेवण्यासाठी प्रस्तुत मंडळावर बाहेरच्या कोणत्याही वकिलाला नियुक्त करण्याची कार्यवाही करणे आवश्यक असल्यास,त्याबद्दलची लेखी कारणे नमूद केल्यानंतर करता येईल. अशा विशेष वकिलाला/समुपदेशीला योग्य ते परिश्रमिक देण्याचा अधिकार सदस्य सचिव यांना राहील.** |
| १० | १३ | मंडळाचा/वकिलाचा पदावधी तीन वर्षासाठी असेल.आवश्यकतेनुसार एका वेळेस आणखी तीन वर्षाच्या कालावधीसाठी, केवळ गुणवतेच्या आधारावरच त्याचे नवीकरण करण्यांत येईल.नवीकरण करणे किंवा नवीकरण नाकारणे याबाबत एकमेव स्वेच्छाधिकार निवड समितीला असेल. | **मंडळाचा/वकिलाचा पदावधी पाच वर्षासाठी असेल.आवश्यकतेनुसार एका वेळेस आणखी तीन वर्षाच्या कालावधीसाठी, केवळ गुणवतेच्या आधारावरच त्याचे नवीकरण करण्यांत येईल.नवीकरण करणे किंवा नवीकरण नाकारणे याबाबत एकमेव स्वेच्छाधिकार निवड समितीला असेल.** |

सबब, सदर विनियमातील सुधारणांना शासनाची मान्यता घेण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१७ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सदस्य सचिव, भाप्रसे हे पद मंत्रालयीन सचिव दर्जाचे असल्याने सदर पदासाठीही ठोक भरपाई मंजूर करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी शासनाच्या दि. ८ मे, २०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सदस्य सचिव यांना, प्रस्तावित ठोक

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

भरपाई लागु आहे किंवा कसे, याबाबतची विचारणा सामान्य प्रशासन विभागाकडे करण्यात यावी व त्यानुसार कार्यवाही करावी, असे नमूद केले.

**कार्यक्रम बाब क्र.१८ :** सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता देणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासकीय अहवालास मान्यता प्रदान करण्याची विनंती मा.संचालक मंडळास करण्यात आली. या संदर्भातील चर्चेत मा.प्रधान सचिव यांनी सन २०११-१२ व सन २०१२-१३ चे वार्षिक अहवाल प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत, याबाबत विचारणा केली. त्यावर प्रभारी मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी नमूद केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेख्यावरील महालेखापाल यांच्याकडुन निरीक्षण अहवाल अद्याप प्राप्त झाले नसल्याने सदरचे अहवाल अंतिम करता आलेले नाहीत.

यावर प्रधान सचिव यांनी नमूद केले की, सन २०११-१२ चे निरिक्षण अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झाले असल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार सन २०११-१२ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु करण्याचे सुचित केले. या अनुषंगाने पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. प्राधिकरणाचा सन २०१०-११ या वर्षाचा वार्षिक अहवाल स्वीकृत करण्यात येत असून, तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. सन २०११-१२ च्या मजीप्राच्या वार्षिक लेख्यावर महालेखापाल यांचे निरीक्षण अहवाल प्राप्त झाले असल्याने, सन २०११-१२ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल तयार करण्यात यावा.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१९** मजीप्राच्या आस्थापनेवरील अभियंता संवर्गातील वर्ग-१ व वर्ग-२ च्या अभियंत्यांच्या सेवा (प्रतिनियुक्तीने) स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करुन देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

दि.२३.११.२०११ रोजी संपन्न झालेल्या मा.संचालक मंडळाच्या १२२ व्या बैठकीत नगरपालिका/महानगरपालिकांकडे मजीप्राच्या अभियंत्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविताना मजीप्राकडील अतिरिक्त कर्मचारीसुध्दा प्रतिनियुक्तीवर घेण्याचे अनिवार्य करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, त्यास प्रतिसाद मिळालेला नसल्याने व स्थानिक स्वराज्य संस्थांकडुन सातत्याने अभियंत्यांची मागणी होत असल्याने, सदरचा निर्णय रद्द करणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, मान्यतेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की,

१. मजीप्राच्या संचालक मंडळाच्या दि. २३.११.२०११ रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीतील कार्यक्रम बाब क्र. ३ च्या अनुषंगाने, नगरपालिका/महानगरपालिकांकडे मजीप्राच्या अभियंत्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविताना मजीप्राकडील अतिरिक्त कर्मचारीसुध्दा प्रतिनियुक्तीवर घेण्याचे अनिवार्य करण्याबाबतचा घेतलेला निर्णय रद्द करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. मनपा व नपाच्या मागणीनुसार तसेच मजीप्राची गरज लक्षात घेऊन, मजीप्रातील अभियंत्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविले जाईल व यापुर्वी अपवाद म्हणुन ज्या अभियंत्यांचे मनपा/नपाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, अशा आदेशाना कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२०** मजीप्रातील कक्ष अधिकारी लेखा अधिकारी व सहा. लेखा अधिकारी पदांना ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार लागु केलेले ग्रेड वेतन मंजुर करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मजीप्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी व वेतन संरचना दि. २७.८.२००९ च्या शासन निर्णयानुसार लागु करण्यात आली आहे. तदनंतर शासनाच्या वित्त विभागाच्या दि. ११ फेब्रुवारी, २०१३ व दि. ४.१२.१३ च्या

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

शासन निर्णयानुसार ज्या संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे त्या संवर्गात मजीप्राच्या लेखा अधिकारी, सहाय्यक लेखा अधिकारी व कक्ष अधिकारी संवर्गाचा समावेश आहे. त्यानुसार या संवर्गातील अधिकाऱ्यांना ग्रेड वेतन मंजुर करण्याचा प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

सदर कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्यात आली असता, सदर प्रस्ताव शासनास सादर करुन, त्यास मान्यता प्राप्त करुन घेण्याचे सुचित केले. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा व त्यावर शासनाकडुन जो निर्णय होईल, त्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही सदस्य सचिव यांनी करावी.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२१** वित्त व लेखा संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना वयोधिक्याचे कारणास्तव (वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्याने) विहित विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मजीप्रामध्ये लेखा संवर्गाचे व पदोन्नतीचे नियम दि.२१.१०.१९९७ पासुन व विभागीय परिक्षेचे नियम दि.२२.१०.९७ पासुन शासन मान्यतेने लागु करण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहेत. या नियमानुसार परिक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पदोन्नती देण्याची तरतूद नाही. मात्र, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १.११.१९७७ च्या शासन निर्णयानुसार सेवा भरती नियमात गरजेनुसार शासकीय कर्मचारी वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यास विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, सदर निर्देशाचा उल्लेख मजीप्राच्या परिक्षेच्या नियमात केलेला नाही.

सदर नियम अस्तित्वात आल्यानंतरही विभागीय परिक्षा उत्तीर्ण नसतानाही काही कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली असून, सदर नियम अस्तित्वात येण्यापुर्वी पदोन्नती देण्यात

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आल्याने, परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन पुर्वीच्या नियमाच्या आधारे सुट दिली आहे. तथापि, दि. २२.१०.१९९७ च्या नियमाच्या कलम-१६ मध्ये पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांना विशेष बाब म्हणून परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याची तरतुद आहे. सदर तरतुद व सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १.११.१९७७ च्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन ४५ वर्षे पूर्ण केलेल्या वित्त व लेखा संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याचे प्रस्तावित आहे. त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती मा.संचालक मंडळास करण्यात आली. सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

१. मजीप्राचे वित्त व लेखा संवर्गाचे सेवा भरती नियम व परिक्षेचे नियम हे शासन मान्यतेने दि. २१.१०.९७ व २२.१०.९७ अन्वये अंमलात आणण्यात आले आहेत. हे परिक्षा नियम अस्तित्वात आल्यानंतर जे कर्मचारी लेखा अधिकारी, सहा.लेखा अधिकारी व उप लेखापाल इ. पदांवर पदोन्नत झाले आहेत व ज्यांनी विहित विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याची केलेली तरतुद विचारात घेऊन कार्यरत अधिकारी/कर्मचारी ज्या तारखेस वयाची ४५ वर्षे पुर्ण करत आहेत त्या तारखेच्या दुसऱ्या दिवसापासुन विहित विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात येत आहे.

२. विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट दिल्यामुळे सुट दिलेले कर्मचारी वरच्या पदावर पदोन्नतीकरीता पदोन्नती नियमानुसार पात्र ठरतील.

त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२२** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक लेख्यास मान्यता देणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन, सन २०१२-१३ च्या वार्षिक लेख्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२३** पाणी पुरवठा योजनांचे संचालन व आवश्यक अनुषंगिक कामे खाजगी सहभागाच्या (PPP) तत्वावर करणेबाबत.

सदर कार्यक्रमबाबीबाबत सदस्य सचिव, मजीप्रा यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१. नागरी क्षेत्रातील बहुतांश योजनांचे दैनंदिन संचालन व देखभाल दुरुस्तीचे काम संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत केले जात आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंदर्भातही दैनंदिन संचालन व देखभाल दुरुस्तीचे काम संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत केले जात आहे. नागरी क्षेत्रातील २५ नागरी पाणी पुरवठा केंद्रांचे दैनंदिन संचालन व देखभाल दुरुस्ती मजीप्रामार्फत केली जाते. या खेरीज ३१ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे संचालन व देखभाल दुरुस्ती मजीप्रामार्फत केली जाते.

२. पाणी पुरवठा क्षेत्रातील योजनांकडे दृष्टीक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, बहुतेक ठिकाणी, पाणी पुरवठा योजनांचे दैनंदिन संचालन "निम्न सेवास्तर - वसुलीचे कमी प्रमाण - आर्थिक असंतुलन - सुधारणांसाठी भांडवली खर्चाकरीता निधीची कमतरता - निम्न सेवास्तर" या दृष्ट चक्रात अडकतात.

३. भांडवली गुंतवणुकीसाठी निधीची कमतरता, पुरेशा व्यावसायिक दृष्टीकोनाचा अभाव, काम करणाऱ्या यंत्रणेतील घटकांवर निश्चित जबाबदारीचा अभाव, विनामहसुल पाण्याचे जादा प्रमण इ. बाबींवर मात करुन पाणी पुरवठा योजनांच्या क्षेत्रामध्ये सक्षमता यावी, जूलै २०१२ मध्ये केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने प्रसिध्द केलेल्या ॲडव्हायझरी नोट खाजगी सहभागाचा (PPP) अंतर्भाव करुन त्यावर भर देण्यात आला आहे. याखेरीज जूलै २०१२ मध्ये केंद्र शासनाच्या नगर विकास विभागांने प्रसिध्द केलेल्या Lesson from Business plans for Maharashtra, Rajasthan, Haryana and International Good Practices या पुस्तिकेमध्ये खाजगी सहभागाच्या अर्थात, PPP तत्वावरील अंमलबजावणीबाबत विवेचन केले आहे. PPP संदर्भात केंद्र व राज्यशासनाने मार्गदर्शक सुचनाही प्रसिध्द केल्या आहेत.

३.१ PPP तत्वावरील अंमलबजावणीबाबत मजीप्रामार्फत पुढीलप्रमाणे प्रयत्न करण्यात आले.

बंद असलेल्या ग्रामीण योजना PPP तत्वावर पुनरुज्जीवित करण्याबाबत सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार फिडबॅक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (फिडबॅक) यांची सल्लागार म्हणून नेमणूक केली. त्यानी सादर केलेल्या Final Feasibility Report व Project Structuring Report ला शासनाने दिलेल्या तत्वत: मान्यतेनुसार मजीप्राने Expression of Interest (EoI) चा प्रस्ताव मागविला होता. एकूण ७ सल्लागार कंपनींच्या प्राप्त प्रस्तावांचे फिडबॅक यांनी विश्लेषण करुन त्यांचा अंतिमअहवाल दि.११.०२.२०१३ रोजी सादर केलेला आहे. EoI मध्ये प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने शासनाकडून खालील बाबींबाबत दि.१२.०६.२०१३ रोजी मार्गदर्शन मागितले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१) RFP/RFQ साठी योजना/योजनांचा समुह घ्यावा याची निश्चिती होणे आवश्यक आहे.

२) बंद योजनांव्यतिरिक्त चालू स्थितीतील काही योजनांचाही यामध्ये समावेश योग्य राहील.

३) Methodology/Approach बाबत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने निर्णय होणे आवश्यक आहे.

४) या योजनांच्या संचालनासाठी वित्तीय व इतर पाठबळ देण्याची गरज आहे.

उपरोक्त बाब अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे.

३.२ तथापि, उपरोक्त प्रस्तावाच्या मान्यतेस काही कालावधी लागेल. त्यामुळे, परिच्छेद ३.१ मध्ये नमुद केलेल्या पार्श्वभुमीवर उपरोक्त सल्लागार फिडबॅक यांच्या प्रतिनीधी बरोबर PPP तत्वावरील संचालन व दैनंदिन देखभाल दुरुस्तीच्या प्रकल्पासंदर्भात चर्चा केली. सदर चर्चेमध्ये फिडबॅक यांनी असे सुचविले की, मजीप्रामार्फत संचालन केल्या जात असलेल्या ग्रामीण व नागरी योजनांपैकी प्रत्येकी एका योजनेच्या PPP तत्वावरील संचालन व दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा प्रस्ताव पथदर्शी तत्वावर विचारात घेणे अधिक संयुक्तिक ठरेल. यास्तव अशा योजना निश्चित करण्यास्तव मुख्य अभियंता यांना निर्देशित केले होते. या अनुषंगाने दि.१०.०३.२०१४ व १२.०३.२०१४ रोजी मुख्य अभियंता यांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये गांधीनगर प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (कोल्हापूर) व गोंदिया पाणी पुरवठा योजना (गोंदिया) या अनुक्रमे ग्रामीण व नागरी योजनांचे संचालन व दैनंदिन देखभाल दुरुस्ती PPP तत्वावर करणे यथायोग्य राहील असे अनुक्रमे मुख्य अभियंता (ना व ग्रा) व मुख्य अभियंता (जव्य) यांनी नमुद केले. खाजगी सहभागामुळे जलव्यवस्थापनातील अद्यावत तंत्रज्ञान व व्यवस्थापन कौशल्याचा वापर होणे अपेक्षित आहे. यामुळे मजीप्राच्या दृष्टीने पुढील हितावह बाबी होतील असेही मुख्य अभियंता यांनी नमुद केले.

✓ संचालन व देखभाल दुरुस्ती अधिक योग्यरित्या होऊन आवश्यक भांडवल गुंतवणुकीसाठी मजीप्राचा निधी खर्च होणार नाही.

✓ सेवास्तरात वृध्दी होईल.

✓ संचालन व देखभाल दुरुस्तीच्या विविध घटकांकरिता जबाबदारी निश्चित होईल.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य/सचिव
म.जी.प्रा.

- ✓ देयक आकारणी, देयक वसुली, गळती नियंत्रण, ग्राहक तक्रार निवारण इ.बाबींमध्ये लक्षणीय सुधारणा होईल.
- ✓ विनामहसुल पाण्याचे प्रमाण आणखी कमी होईल.
- ✓ सर्वसाधारण कार्यक्षमतेत वाढ होईल.

सदरच्या योजना PPP तत्वावर राबविण्यासाठी अनुक्रमे मुख्य अभियंता, ना. व ग्रा. व मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांनी प्रस्तावित केल्या आहेत. सदरचे प्रस्ताव मजीप्राच्या हिताचे असून, मंजूर करण्यास सदर मुख्य अभियंता यांनी शिफारस केली आहे. त्यानुसार प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे अवगत करण्यात आले. यावर चर्चा होऊन प्रस्तावास मान्यतेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठरावः**

असा ठराव करण्यात येतो की, "गांधीनगर प्रादे. पाणी पुरवठा योजना (जि.कोल्हापूर)" आणि "गोंदिया नागरी पाणी पुरवठा योजना" या २ योजनांचे संचालन, दैनंदिन देखभालीसह अनुषंगिक कामांची PPP तत्वावर अंमलबजावणी करण्याबाबत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२४ मजीप्राच्या स्थावर मालमत्तांचा व्यावसायिक दृष्टीने विकास करण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

राज्यातील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रासंदर्भातील, ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने बदललेल्या धोरणानुसार मजीप्राकडील योजनांचा कार्यभार कमी झाल्याने त्याप्रमाणात इटीपी उत्पन्नात घट झाली आहे. स्वाभाविकपणे, मजीप्राची वित्तीय स्थिती विकासकामांमध्ये स्वत:ची भांडवली गुंतवणुक करण्यासाठी सक्षम नाही. तथापि, मजीप्राची सुयोग्य पायाभूत सुविधांची गरज व मजीप्राच्या ताब्यातील मोकळ्या व विनावापर पडून असलेल्या जागांवर अतिक्रमणाचा धोका विचारात घेतल्यास, या जागा व्यावसायिक तत्वावर विकसित केल्यास त्यातून मजीप्राची पायाभूत सुविधांची गरज तर भागेलच शिवाय मजीप्राला उत्पन्नही मिळू शकेल. म्हणून मोकळ्या जागांचा

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

"बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर खाजगी सहभागाने विकास करण्याबाबत यापूर्वीही मा.संचालक मंडळाने चर्चा करुन निर्णय घेतले आहेत.

वरील अनुषंगाने मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले की, दि.२५.०१.२००६ रोजी १०२ व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार स्टॅव्हली रोड, पुणे येथिल जागा "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर विकसित करण्यात आली आहे. तसेच दि.२९.०९.२०१० रोजी ११८ व्या बैठकीत मा.अध्यक्ष, मजीप्रा यांनी विनावापर स्थावर मालमत्तांचा विकास करणे गरजेचे आहे, असे निर्देशित केले. तद्नंतर, दि.२०.०९.२०१२ रोजी १२५ व्या बैठकीत अंधेरी (मुंबई) व पनवेल (रायगड) येथिल जागांचा "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर विकास करण्याच्या प्रस्तावांना तत्वत: मान्यता प्रदान करुन प्रस्तावांना शासनाची मान्यता घेण्याचे निर्देश दिले. या अनुषंगाने अंधेरी (मुंबई) येथिल जागेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असता, शासनाने दि.०८.०३.२०१३ रोजी मजीप्रास असे निर्देशित केले की, "सदरचा भुखंड विकसित करण्याची आवश्यकता असल्यास, मजीप्राने स्वत: भुखंड विकसित करणेबाबत योग्य ती तपासणी करुन प्रस्ताव शासनास सादर करावा."

वरील शासन निर्देशांच्या पार्श्वभूमीवर मोकळ्या जागांचा व्यावसायिक तत्वावर विकास करण्यासंदर्भात तपासणी करीत असताना असे निदर्शनास आले की, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) यांनी असे विकसन केले आहे. तथापि, त्यांच्याकडे यासंदर्भात अंमलात आणल्या जात असलेल्या निर्देश/कार्यपध्दतीकडे पहाता, मजीप्रा हे प्राधिकरण असल्याने, MSRTC ने अंमलात आणलेली पध्दत अनुसरणे मजीप्रासाठी अधिक योग्य ठरेल, अशी चर्चा झाली. तसेच मा.संचालक मंडळास असेही अवगत करण्यात आले की, MSRTC कडून जागांच्या व्यावसायिक तत्वावरील विकसनाबाबत राज्याच्या गृहविभागाने दि.०१.०२.२००१ रोजीच्या शासननिर्णयाद्वारे व नगरविकास विभागाने दि.१७.१०.२००१ च्या शासन निर्णयाद्वारे स्वयंस्पष्ट मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्याच धर्तीवर मजीप्रासाठी सुचना शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून निर्गमित होणे आवश्यक आहे. म्हणजे त्याआधारे MSRTC प्रमाणे मजीप्राचे परिपत्रक निर्गमित करता येईल.

तथापि, सद्य:स्थितीत, मजीप्राच्या ताब्यातील ३३४ मालमत्तांपैकी व्यावसायिक तत्वावरील विकसन योग्य ३३ जागांपैकी, प्रथम टप्प्यात अंधेरी (मुंबई), तक्का-पनवेल (रायगड) व गारखेडा (औरंगाबाद) या स्थळांचा विकसन प्रस्ताव तयार करणे प्रस्तावित आहे. या तिन्ही जागांसंदर्भात मजीप्राच्या दृष्टीने अधिक हितावह सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ सल्लागार नियुक्ती आवश्यक आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावाबाबत चर्चा होऊन, पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठरावः**

**असा ठराव करण्यात येतो की,**

१. मजीप्राच्या ताब्यातील स्थावर मालमत्तांचा व्यावसायिक तत्वावर उपयोग करण्यासाठी, MSRTC संदर्भात शासनाच्या गृह विभागाने व नगरविकास विभागाने अनुक्रमे दि.०१.०२.२००१ व दि.१७.१०.२००१ च्या शासननिर्णयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे मार्गदर्शक सुचना तयार करुन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडून अशा प्रकारच्या सुचना निर्गमित करण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

२. पहिल्या टप्प्यात, मजीप्राच्या अंधेरी (मुंबई), तक्का-पनवेल (रायगड) व गारखेडा (औरंगाबाद) येथिल मालमत्तांचा व्यापारी उपयोग करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यास्तव मजीप्राच्या प्रचलित पध्दतीने जाहीर निविदा सुचनेद्वारे सल्लागार नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर सल्लागाराची फी इ. रक्कम सुरुवातीस मजीप्राने स्वतःच्या निधीतुन करण्यास व त्याची प्रतिपूर्ती विकासकाकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१** मजीप्राच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रे/ग्रामीण पाणी पुरवठा योजनातील पाण्याच्या दराबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

मजीप्राच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रांद्वारे तसेच मजीप्रामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा केंद्रातुन केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या पाणीपट्टीचे दर दि.१.१०.२०१३ च्या अधिसुचनेनुसार लागु करण्यात आले आहेत. तथापि, यापैकी लातुर, बल्लारपुर व देहु पाणी पुरवठा केंद्रासाठी लागु करण्यात आलेल्या, सदर दि.१.१०.२०१३ च्या अधिसुचनेनुसार पाणीपट्टी भरण्यास स्थानिक स्वराज्य संस्था तसेच लोकप्रतिनिधींनी तीव्र विरोध केला असून, जनआंदोलनेही केली आहेत. त्याचप्रमाणे निवेदनेही सादर केली आहेत.

सदर बाब विचारात घेऊन, मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांनी सदर तीन्ही पाणी पुरवठा केंद्रांचा आढावा घेऊन, सुधारित दर प्रस्तावित केले आहेत. त्यानुसारच्या प्रस्तावास

मा. मंत्री,<br>पा.पु. व स्व. तथा<br>अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव<br>म.जी.प्रा.

मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात येत असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन, पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. लातुर पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेस हस्तांतरित करावयाची असल्याने, पाणीपट्टी कमी करण्याचा प्रस्ताव विचारात घेण्याची आवश्यकता नाही.
२. देहु पाणी पुरवठा केंद्रांतर्गत प्रगतीपथावरील योजना येत्या ६ महिन्यांत पूर्ण होणार असून, सदर योजना व अस्तित्वातील योजना देहु ग्रामपंचायत स्वतः चालविणार असल्याने, मजीप्राकडील योजना हस्तांतरित करणे क्रमप्राप्त ठरते. त्यानुसार ६ महिन्यानंतर देहु पाणी पुरवठा केंद्र ग्रामपंचायतीस हस्तांतरित करण्यात यावी.

   मात्र, या ६ महिन्यांसाठी मजीप्रामार्फत केंद्र चालविण्यात येईल. या कालावधीसाठी अधिसुचनेनुसार लागु केलेला दर कमी करुन, रु.१५० प्रती ग्राहक प्रतिमाह असा आकारण्यात यावा. त्याचप्रमाणे बैठकीच्या म्हणजेच दि. २०.५.२०१४ पर्यंत पुर्वीच्याच म्हणजेच रु. १३०/- प्रती ग्राहक प्रतिमाह या दराने पाणीपट्टी आकारणी करावी.
३. बल्लारपुरसाठी सवलतीचे दर १ फेब्रुवारी, २०१३ पासुन लागु करण्यात आले होते. त्या दरावर १०% इतकी वाढ विचारात घेऊन दर आकारणी करावी.सदर सुधारित दर आकारणी दि. १.१०.२०१३ पासुन लागु राहील.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ मजीप्रातील अभियांत्रिकी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम-६६ (१) मध्ये २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांने नियुक्ती प्राधिकाऱ्यास ३ महिन्यांची लेखी नोटीस देऊन, सेवेमधुन केव्हाही सेवा निवृत्त होण्याची तरतूद आहे.

तथापि, मजीप्रातील कार्यरत अभियांत्रिकी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या स्वेच्छा निवृत्तीचे वाढते प्रमाण व दैनंदिन कामासाठी अभियंत्यांची आवश्यकता या बाबी विचारात घेऊन ज्या अभियंत्यांनी सेवा ३० वर्षे पूर्ण झाली आहे मात्र स्वेच्छा निवृत्तीची नोटीस दिली आहे, ती मंजुर करण्याचा निर्णय दि. २६.२.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा.संचालक मंडळाच्या १२७ व्या बैठकीत घेण्यात आला आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

तथापि, सदर निर्णयाचा पुनर्विचार व्हावा, अशी मजीप्रामधील अभियंत्यांची मागणी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कोट्यातील सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता, श्रेणी-१ गट-अ व सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ गट-ब ही पदे लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबत मागणी केली आहे. त्यापैकी सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ संवर्गातील १५५ पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे सदर पदे भरल्यानंतर अभियंत्यांची संख्या जास्त होणार आहे. या बाबी विचारात घेऊन, दि. २६.२.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा.संचालक मंडळाच्या १२७ व्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्याचे प्रस्तावित असून, तसा प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, स्वेच्छा निवृत्तीबाबत मा.संचालक मंडळाच्या दि. २६.२.२०१३ च्या १२७ व्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय या ठरावाद्वारे रद्द करण्यात येत असून, यापुढे मनासे (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम-६५ व ६६ मधील तरतुदीनुसार मजीप्रातील अभियंत्यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्ती मंजुर करण्याबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. संचालक मंडळासमोर सादर झालेल्या सर्व कार्यक्रम बाबीं तसेच आयत्या वेळी प्राप्त झालेल्या दोन (२) कार्यक्रम बाबींवरील चर्चा पुर्ण झाली. दरम्यान, बैठकीच्या अखेरच्या टप्प्यात मा.मंत्री, ग्राम विकास तथा सहअध्यक्ष आणि मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचा निरोप घेतला.

तद्नंतर, मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी **"मजीप्राची पुनर्रचना"** या विषयाच्या अनुषंगाने चर्चा उपस्थित केली. सदर प्रकरणी मजीप्राच्या पुनर्रचनेबाबत सदस्य सचिव, मजीप्रा यांनी अभिप्राय व्यक्त करावेत, अशी चर्चा झाली. यानुसार सदस्य सचिव यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले.

**मजीप्रा अंतर्गत संस्थात्मक पुनर्रचनेची पार्श्वभूमी.**

महाराष्ट्र शासनाने सन १९९५ साली पाणी पुरवठ्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यासाठी बृहत आराखडा तयार केला. बृहत आराखड्यातील समाविष्ट कामे शिघ्रगतीने

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

पुर्ण करण्यासाठी शासनाच्या मान्यतेने जून, १९९७ पासून मजीप्राची संरचना प्रादेशिक मुख्य अभियंत्यांची करण्यात आली.

तद्नंतर, ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील बदललेल्या शासन धोरणाच्या अनुषंगाने सन २००० पासून स्थानिक स्वराज्य संस्थांची भुमिका मध्यवर्ती ठरली. तद्नंतर, या क्षेत्रातील बव्हंशी ग्रामीण योजनांची अंमलबजावणी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे तर नागरी क्षेत्रातील योजनांची अंमलबजावणी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अखत्यारीत आली. बव्हंशी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कल योजना स्वत: राबविण्याकडे असल्याने, मजीप्राचा कार्यभार कमी झाला. पर्यायाने, शासनाच्या वतीने योजना राबवितांना योजनेच्या खर्चाच्या प्रमाणात मजीप्राला आपोआप मिळणारा ई.ॲन्ड.पी हा महसूल कमी झाला. मात्र सर्व अधिकारी कर्मचारी मजीप्राकडेच राहीला. दिवसेंदिवस निवृत्तीवेतनाचा खर्च वाढतच आहे. (सद्य:स्थितीत, कमी झालेल्या कार्यभारा सोबतच ई.ॲन्ड.पी चा दर देखिल पुर्वीच्या १७.५०% च्या ऐवजी ५ ते ९% पर्यंत कमी करण्यात आला आहे).

दरम्यानच्या काळात आर्थिक असंतुलनावर मात करण्याच्या दृष्टीने मजीप्राकडून स्थानिक स्वराज्य संस्थेची पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण ठेव तत्वावर मिळविणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची कामे घेणे, TSP ची कामे मिळविणे व मजीप्राच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रांची क्षमता सुधारुन महसूलात वाढ करणे इ. उपाययोजना अंमलात आणल्या जात होत्या. परंतु त्यावेळच्या संरचनेस आवश्यक कार्यभार मिळवणे शक्य न झाल्याने व भविष्यात पुरेसा कार्यभार मिळणे दृष्टीपथास नसल्याने त्यावेळच्या संरचनेनुसार मजीप्राचे आर्थिक संतुलन साध्य होत नसल्याचे दिसून आले.

म्हणुनच, मजीप्राची पुनर्ररचना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याची बाब विचारात घेऊन, मजीप्राच्या प्रशासकीय रचनेमध्ये अंतर्गत बदल करुन अपेक्षित बळकटीकरण साध्य होईल या दृष्टीने मजीप्राच्या मा.संचालक मंडळासमोर दि.२६.०८.२००८ रोजी १११ व्या बैठकीत कार्यक्रम बाब सादर करण्यात आली असे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले. सदर कार्यक्रमबाबीत पुढील बाबींवर भर देण्यात आला होता.

➢ प्राप्त परिथितीत योजनांच्या अंमलबजावणीच्या पध्दतीत आमूलाग्र बदल झाला असल्याने व ज्या बृहत् आराखडयातील कामासाठी प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता कार्यालये स्थापन केली होती, त्या बृहत् आराखडयातील कालमर्यादाच आता संपुष्टात आली असल्याने मजीप्रा च्या प्रादेशिक मुख्य अभियंत्यांनी विद्यमान संरचनेत बदल करणे क्रमप्राप्त झाले आहे.

➢ पाणी पुरवठा संबंधीची सर्वच कामे प्रत्येक मुख्य अभियंता यांचेकडे असल्याने एकाच विषयाकडे पाहिजे तेवढे लक्ष पुरविले जात नाही. या कारणास्तव प्रत्येक मुख्य अभियंता

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

यांचेकडे एकाच प्रकारची जबाबदारी सोपविल्यास त्यांना त्याकडे विशेष लक्ष पुरविता येईल व त्यांना त्या जबाबदारीबाबत accountable करता येईल.

वरील बाबींचा विचार करुन सदर कार्यक्रम बाबीमध्ये प्रादेशिक विभाग केंद्रस्थानी असलेल्या रचनेच्या ऐवजी देखभाल दुरुस्ती, नागरी ग्रामीण योजना, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, मध्यवर्ती नियोजन आणि अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य या विशिष्ट क्षेत्रांसाठी स्वतंत्र मुख्य अभियंत्यांची रचना प्रस्तावित करण्यात आली होती. सदर कार्यक्रम बाबीस मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

डिसेंबर २००८ मध्ये मजीप्रा पुनर्रचनासंदर्भात सल्ला देण्यासाठी शासनाने पुन्हा एकवार सल्लागार नियुक्ती केली. सल्लागारांनी जूलै २०१० मध्ये सादर केलेल्या अहवालात मजीप्रा व मजीप्राच्या अंतर्गत देखभाल व दुरुस्ती आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा अशा दोन कंपन्यांची शिफारस केली.

दरम्यानच्या काळात, वर नमुद केल्याप्रमाणे मजीप्राचा कमी झालेला कार्यभार व महसुलात होणारी घट यामुळे मजीप्रा समोर आर्थिक असंतुलनाची समस्या कायम होती. मजीप्रास निवृत्ती वेतन, भत्ते, प्रशासकीय खर्च व निवृत्तीवेतनासाठी कोणतेही अनुदान मिळत नाही. परिणामी, कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन, भत्ते व निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतनाचा खर्च कसा भागवावा हा पेचप्रसंग तसाच राहीला.

**मजीप्रा अंतर्गत संस्थात्मक सुधारणा:**

वरील परिस्थितीतुन मार्ग काढण्यासाठी मजीप्राच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीकोनातुन प्रभावी कार्यवाही करण्याच्या दृष्टीने मजीप्रा अंतर्गतच प्रयत्न सुरु करणे अत्यावश्यक ठरले. या दृष्टीने प्रथमत: संचालक मंडळाने दि. २२.०८.२००८ रोजी १११ व्या बैठकीतील ठरावावर कार्यवाही करण्याखेरीज पर्याय नसल्याचे निदर्शनास आले.

म्हणून, उत्पन्नवाढीच्या दृष्टीने, मजीप्राची विविध स्वरुपाची कामे विकेंद्रित करुन स्वतंत्र जबाबदारीसह त्यांचे नियंत्रण स्वतंत्र मुख्य अभियंत्यांकडे देण्याच्या दृष्टीने, मजीप्राच्या अंतर्गत संस्थात्मक सुधारणा प्रस्तावाबाबतची टिप्पणी मा.प्रधान सचिव, पा.पु व स्व विभाग यांच्यामार्फत मा.राज्यमंत्री तथा उपाध्यक्ष, मजीप्रा आणि मा.मंत्री, पा.पु व स्व तथा अध्यक्ष मजीप्रा यांच्याकडे सादर करण्यात आली. सदर प्रस्तावाच्या मान्यतेस अनुसरुन मजीप्राच्या दि.०३.११.२०११ च्या आदेशानुसार अंतर्गत संस्थात्मक पुनर्रचना करण्यात आली असे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले.

**- संस्थात्मक अंतर्गत पुनर्रचनेचा परिणाम :**

संस्थात्मक अंतर्गत पुनर्रचनेचा परिणाम विशद करतांना सदस्य सचिव यांनी पुढील बाबी मा.संचालक मंडळासमोर स्पष्ट केल्या.

मा. मंत्री,<br>पा.पु. व स्व. तथा<br>अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव<br>म.जी.प्रा.

✓ उपरोक्त प्रमाणे अंतर्गत पुनर्ररचना केल्याने विशिष्ट जबाबदारीमुळे कार्यक्षमतेतील वाढीच्या अनुषंगाने उत्पन्नात वाढ झाल्याचे स्पष्ट दिसते. तुलनात्मक परिणाम पुढीलप्रमाणे नमुद केले.

| सन | नफा / तोटा | शेरा |
|---|---|---|
| २०१०-११ | (-) २७.५५ कोटी | मजीप्रा सन २०११मधिल पुनर्रचनेनंतर आर्थिक स्थितीत निश्चित सुधारणा. |
| २०११-१२ | (-) १४.९६ कोटी | |
| २०१२-१३ | (-) ०३.६० कोटी | |
| २०१३-१४ | (+)०५.३७ कोटी | |

✓ Verticles सरचनेमुळे विशिष्ट महसुली उत्पन्नात झालेली ठळक वाढ.

| तपशिल | महसुली उत्पन्न | | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०१३-१४ | |
| पाणी विक्री | १३४.७४ | २१६.२४ | ६०.००% |
| इ अँड पी. | ५९.४५ | ६४.८५ | ०९.००% |
| अन्य | ९१.४६ | १३५.०० | ४७.६०% |

✓ देखभाल दुरुस्ती, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, नागरी व ग्रामीण योजना इ. विविध कामे विकेंद्रित करुन जबाबदारीसह त्यांचे नियंत्रण स्वतंत्र मुख्य अभियंत्यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र Verticle कडे सोपवल्यामुळे त्यांना त्यावर विशेष लक्ष पुरवणे शक्य झाले. विशिष्ट कामांखेरीज अन्य स्वरुपाच्या कामांचे उत्तरदायित्व त्यांच्याकडे राहीले नाही. अर्थात, आपल्या Verticle ची संबधित कामांची जबाबदारी, महसुल वाढीची जबाबदारी व तदर्थ उपायोजनांची जबाबदारी आपोआपच आल्याने कार्यक्षमतेतही वाढ झाली. कार्यक्षमतेची वाढ वर नमुद केल्याप्रमाणे महसुल वाढीमुध्ये स्पष्ट पणे परावर्तीत झाल्याचे दिसुन येते.

✓ सदस्य सचिव यांनी असेही नमुद केले की, उपरोक्त महसुल वाढीमुळे खऱ्या अर्थाने माहे डिसेंबर २०११ नंतर वेळोवेळी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या समकक्ष करण्यात आला. तथापि, अनुज्ञेय दिनांक व प्रत्यक्ष अदायगीचा महिना यातील तफावतीची रक्कम अदा करण्यास माहे एप्रिल २०१३ पासून सुरुवात करण्यात आली. आता मजीप्रातील कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांच्या समकक्ष आहे.

मजीप्राच्या संस्थात्मक पुनर्रचनेनंतर, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.११.२०१२ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये मजीप्रावरील वेतन/निवृत्ती वेतनाचे

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

दायित्व, पाटबंधारे महामंडळाच्या धर्तीवर, शासनाने स्वीकारणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे तसेच Water Utility कंपन्या स्थापन करण्याची कार्यवाही करावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन, मजीप्राच्या वेतन व भत्त्यांचे दायित्व शासनाने स्वीकारणाबाबतचा सविस्तर प्रस्ताव मजीप्राने दि.२८.०१.२०१४ रोजी शासनास सादर केला आहे.

मजीप्रा कर्मचाऱ्यांच्या वेतन/निवृत्ती वेतनाचे शासनावर दरमहा दायित्व रु.२९.५४ कोटी एवढे राहील व मजीप्राकडून शासनास दरमहा मिळणारे उत्पन्न रु.९.०० कोटी एवढे राहील. म्हणजेच शासनावर, सद्यस्थितीतील वेतनमानानुसार येणारा दरमहा भार सुमारे रु.२०.५४ कोटी एवढा राहील. मजीप्राच्या सध्याच्या संरचनेत कोणताही बदल करावयाचा झाल्यास, मजीप्राच्या संस्थात्मक व आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने सदर बदल उपरोक्त वेतन व निवृत्तीवेतनाचे दायित्व शासनाने स्वीकारण्याच्या प्रस्तावाशी निगडीत ठेवणे मजीप्राच्या दृष्टीने संयुक्तिक ठरेल.

उपरोक्त पार्श्वभुमीवर सदस्य सचिव यांनी अंतिमत: असेही स्पष्ट मत सादर केले की,

- मजीप्राच्या सध्याच्या Verticles संरचनेमुळे मजीप्राच्या उत्पन्नात निश्चितपणे वाढ झाली आहे. म्हणुनच, सध्याच्या संरचनेचा फेरविचार करुन प्रादेशिक मुख्य अभियंता स्वरुपाच्या संरचनेच्या पुनरुज्जीवनाचा विचार करावयाचा झाल्यास तसा प्रस्ताव, मजीप्राच्या वेतन व निवृत्तीवेतनाचे दायित्व शासनाने स्वीकृत करण्यासंदर्भात शासनास सादर केलेल्या प्रस्तावाशी निगडीत ठेवणे मजीप्राच्या संस्थात्मक व आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने संयुक्तिक राहील.
- मजीप्राच्या वेतन व निवृत्तीवेतन तसेच Water Utility स्थापन करण्याबाबत दि.२२.११.२०१२ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी बैठकीत निर्देशित केलेले असल्याने, संस्थात्मक पुनर्रचनेबाबतच्या कोणत्याही प्रस्तावाबाबत मा.मुख्यमंत्री यांना अवगत करुन उपरोक्त बैठकीतील Water Utility स्थापनेबाबतचे निर्देश रद्द करुन घेणे/स्थगित करणेबाबत कार्यवाही करणे यथोचित राहील.
- मजीप्राची पुनर्रचना मजीप्राच्या संस्थात्मक, आर्थिक व प्रशासकीय बाबींशी निगडीत असलेली मुलभूत बाब असल्याने, भविष्यात, तपशिलवार कार्यक्रम बाब मजीप्राच्या मा.संचालक मंडळासमोर विचारार्थ सादर करुन त्यावर मा.संचालक मंडळाचा निर्देशानुसार पुढील कार्यवाही करणे योग्य ठरेल असे सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष, मजीप्रा यांच्यासमोर सादर केले.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.